दिशादर्शक, मार्गदर्शक!

# दिवा न्यूज

www.diwanews.com

▶ वर्ष-२ ■ अंक-३२ ■ epaper.diwanews.com ■ सोमवार, १३ मार्च २०२३ ■ पाने-८ ■ किंमत ४ रु. RNI No.-MAHMAR/2021/80669



आता डिजिटल स्वरुपात...

दिवा न्यूजची वेबसाईट सुरु..!

ताज्या घडामोडी आणि बातम्यांसाठी लॉग इन करा

www.diwanews.com

आता कुठेही असा...दिवा न्यूज वाचा एका क्लिक वर..

epaper.diwanews.com


# ठाणे महापालिकेने महिला आणि चिमुकल्यांचा जीव धोक्यात घालू नये

दिवा न्यूज विशेष /एस.के.

**ठाणे:-ठाणे शहरातील रस्ते हे दुचाकी फ्रेंडली बनवण्यात यावेत अशी मागणी करताना, भारतीय जनता पार्टीचे ठाणे जिल्हा उपाध्यक्ष निलेश चव्हाण यांनी ठाणे महानगरपालिकेला रस्त्यांच्या दुरावस्थेमुळं महिला व लहान मुलं यांचा जीव धोक्यात येत असल्याकडे लक्ष वेधले आहे.**

ठाणे शहरातील अनेक रस्त्यांवर एकतर उंचवटे आहेत, नाहीतर खड्डे तरी आहेत. रस्त्यावरील चेंबरची झाकणे रस्त्याच्या पृष्ठभागाच्या पातळीशी समांतर बसवलेली नाहीत. गॅसलाईनसाठी, पाईपलाईनसाठी, केबल साठी किंवा अन्य तस्सम कामासाठी खोदलेले रस्ते योग्य पद्धतीने रस्त्याच्या समांतर पातळीत बुजवलेले नाहीत. कॉंक्रीटच्या रस्त्यामधील सांधे डांबराने भरलेले नाहीत. या सर्व कारणांमुळे टू व्हीलर चालवताना नागरिकांना फार अडचणी येतात.विशेषतः महिला जेव्हा मुलांना शाळेत सोडायला दुचाकीवरून जातात तेव्हा त्यांच्यासह त्यांच्या चिमुकल्यांचा जीव ही धोक्यात असतो. याची गंभीर दखल घेऊन पालिका आयुक्तांनी विभाग वार रस्त्याचे ज्युनिअर इंजिनियर यांना सोबत घेऊन टू व्हीलर वरून फेरफटका मारावा व तात्काळ असे स्पॉट दुरुस्त करण्याचे आदेश द्यावेत, अशा आशयाचे ट्विट निलेश चव्हाण यांनी पालिका आयुक्त अभिजीत बांगर यांना केले आहे. हा प्रकार गंभीर असल्याचे निलेश चव्हाण यांनी म्हटले आहे.रस्त्याच्या मधील सांधे न भरल्याने अनेक वेळा टू व्हीलर स्लिप होऊन अपघात होत असतात. त्याचबरोबर केबल टाकण्यासाठी खोदलेले रस्ते हे नीट न बुजवल्याने तेही टू व्हीलरच्या अपघाताला कारणीभूत ठरतात. रस्त्यावरील चेंबरची झाकणे रस्त्याच्या पृष्ठभागाच्या पातळीशी समांतर बसवलेले नसतील तर त्यातून होणारे अपघातांची संख्या देखील जास्त आहे. या छोट्या छोट्या गोष्टी असल्या तरी यामुळे होणारा परिणाम हा गंभीर स्वरूपाचा व सामान्य माणसाच्या जीवावर बेतणारा असल्याने याची दखल पालिकेने तात्काळ घ्यावी अशी मागणी निलेश चव्हाण यांनी केली आहे.



## दुचाकीसाठी धोकादायक रस्ते तात्काळ दुरुस्त करण्याची निलेश चव्हाण यांची पालिकेकडे मागणी



# जिद्दच ठाण्यामध्ये शिवसेनेला विजयाकडे घेऊन जाईल

ठाणे : शिवसेनाप्रमुख आणि शिवसेनेच्या पाठीत खंजीर खूपसणाऱ्यांना अद्दल घडवून आणि त्यांचा सूड ही घेवू. ठाण्यातील जनता ही शिवसेनेसोबत आहे. त्यांची जिद्दच ठाण्यामध्ये शिवसेना विजयाकडे घेऊन जाईल असा विश्वास खासदार संजय राऊत यांनी शुक्रवारी ठाण्यात बोलताना व्यक्त केला. तर शिवसेनेचे ठाणे, ठाण्याची शिवसेना हे नाते कधीही, कोणीही तोडू शकणार नाही. ठाणे हे बाळासाहेबांपाठोपाठ उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्यामागे उभे राहिले आहेत. तसेच मी स्वतः जाऊन उद्धव ठाकरे यांना सांगणार की, तुम्ही खेड व इतर ठिकाणी जश्या सभा घेतल्या तशीच एक विराट सभा ठाण्यात घेवून ठाणेकर जनतेशी संवाद साधावा असे ही ते म्हणाले.



ठाण्यातील मनोरमानगर, शनी मंदिर येथील शिवसेना शाखेच्या वतीने शुक्रवारी शिवजयंतीचे आयोजन केले होते. त्या ठिकाणी खासदार राऊत यांनी भेट दिली. यावेळी त्यांच्यासोबत ठाण्याचे खासदार राजन विचारे उपस्थित होते. कार्यक्रम स्थळी उपस्थित शिवसैनिकांना संबोधताना, त्यांनी वरील विश्वास व्यक्त केला. यावेळी बोलताना, येथे आल्यावर वाटले शिवजयंती सुरू आहे. ही शिवजयंती शिवसेनेची आहे. शिवरायांच्या विचारांनी बाळासाहेबांनी शिवसेनेची स्थापना केली. असेही ते म्हटले. शिवसेना ही ठाण्यात जागेवर आहे. फक्त त्या दिवसाची वाट पाहतेय. कधी जाऊन मतदान करतो. असे ते म्हणाले. पुढे बोलताना, बरेच दिवस ठाण्यात यायचं होते. आज योग जुळून आला. हे चित्र पाहून मी स्वतः उध्दव ठाकरे यांना सांगणार आहे. खेड व इतर ठिकाणी जश्या सभा घेतल्या आणि तेथील जनतेशी संवाद साधला तसाच संवाद ठाणेकर जनतेशी साधण्यासाठी ठाण्यात एक विराट सभा घ्यावी अशी विनंती करणार असल्याचे सांगितले. शिवजयंतीला येथे आलेले लोक भाडोत्री नाहीत. किंवा खोक्यांवर बसून ही आलेले नाहीत असे म्हणत, ठाण्याचा रंग हा भगवाच राहील असा विश्वास ही त्यांनी बोलून दाखवला. तर येथे जमलेली ताकद आणि त्यांची जिद्द पाहून हीच जिद्दच ठाण्यामध्ये शिवसेनेला विजयाकडे घेऊन जाईल असा बोलून शिवसैनिकांमध्ये त्यांनी ऊर्जा निर्माण करण्याचे काम केले.

## तलावात अडकलेल्या तरुणाची सुटका

ठाणे: मद्यधुंद अवस्थेत महापालिका मुख्यालयासमोरील कचराळी तलावामधील फायबर बोट घेऊन तलावामध्ये बोटींगकरीता गेलेला अक्षय आत्माराम दुबे (२८) हा तरुण बोटसह तलावामध्ये अडकल्याची घटना शनिवारी सकाळी साडेआठ वाजण्याच्या सुमारास समोर आली. या घटनेची माहिती मिळताच घटनास्थळी नौपाडा पोलीस व आपत्ती व्यवस्थापन कक्षाचे कर्मचारी यांनी धाव घेतली. तर, आपत्ती व्यवस्थापन कक्षाच्या कर्मचाऱ्यांनी त्याला तलावमधून सुखरूप बाहेर काढून पोलिसांच्या ताब्यात दिले. तो तरुण टेकडी बंगला परिसरातील रहिवाशी आहे.

## केबलला आग

**ठाणे:** कळवा ब्रीज उतरणीला टोरंट पॉवरच्या विद्युत केबलला शॉर्टसर्किट होऊन आग लागल्याची घटना शुक्रवारी रात्री दहा वाजण्याच्या सुमारास घडली. या घटनेत कोणालाही दुखापत झाली नसून या घटनेची माहिती मिळताच घटनास्थळी टोरंट पॉवर विद्युत कर्मचारी व अग्निशमन दलाचे जवान यांनी धाव घेतली. तसेच लागलेली आग अग्निशमन दलाच्या जवानांनी तासाभरात नियंत्रणात आणली. अशी माहिती आपत्ती व्यवस्थापन कक्षाने दिली.

## बारावीचा गणिताचा पेपर फुटल्याप्रकरणी संबंधित शिक्षकांचे निलंबन

: बारावीचा गणिताचा पेपर फुटल्याप्रकरणी राज्य मंडळाच्या मौखिक आदेशानुसार आणि अमरावतीच्या विभागीय मंडळाच्या लेखी आदेशानुसार बुलढाणा जिल्ह्यातील सिंदखेड राजा येथील पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला आहे. या प्रकरणी आत्तापर्यंत सात संशयित आरोपींना अटक करण्यात आली असून संबंधित शिक्षकांच्या निलंबनाचे निर्देश देण्यात आल्याचे शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांनी विधानसभेत सांगितले.

बारावीच्या गणिताचा पेपर फुटल्याप्रकरणी विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी विधानसभेत मुद्दा उपस्थित केला होता, त्यासंबंधी श्री केसरकर यांनी विधानसभेत निवेदन केले.

मंत्री केसरकर म्हणाले, उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षेचा गणित या विषयाचा पेपर दि.०३.०३.२०२३ रोजी सकाळी ११.०० ते २.१० या वेळेत आयोजित करण्यात आला होता. पेपर चालू असतानाच साधारणतः दुपारी १२.३० च्या दरम्यान एका वृत्तवाहिनीवर या पेपरची ६ आणि ७ नंबरची पाने व्हायरल झाल्याची बातमी प्रसारित करण्यात आली. ही पाने साधारणतः सकाळी १०.३० नंतर व्हायरल झाल्याचे वृत्तवाहिनीवर प्रसारित करण्यात आले. आरोपींपैकी ३ आरोपी शिक्षक आहेत. हे स्वयंअर्थसहाय्यीत शाळेतील शिक्षक आहेत. शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जि. बुलढाणा यांना संबंधित शिक्षकांवर निलंबनाची कारवाई करण्याबाबत विभागीय मंडळ, अमरावती यांच्यामार्फत कळविण्यात आले असून त्या अनुषंगाने शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जि.प. बुलडाणा यांनी संबंधित शिक्षकांना तात्काळ निलंबित करण्याबाबत संबंधित संस्था / शाळांना निर्देश दिले आहेत.

डिसिल्वा हायस्कूल, कबुतर खाना, दादर पश्चिम, मुंबई या केंद्रावर एका विद्यार्थ्याकडे मोबाईल आढळून आला व या मोबाईलवर इयत्ता १२ वी गणिताच्या पेपरचा काही भाग आढळून आला. यासंदर्भात केंद्रसंचालक यांनी दि.०४.०३.२०२३ रोजी शिवाजी पार्क, पोलीस ठाणे, दादर, मुंबई येथे फीर्याद दाखल केली आहे. या गुन्ह्याचा तपास मुंबई पोलीस गुन्हे शाखेकडे गेला असून या गुन्ह्यामध्ये तीन अल्पवयीन व्यक्ती आरोपी आहेत. या संपूर्ण प्रकरणाचा पुढील तपास पोलीस करीत असल्याचेही केसरकर यांनी सांगितले.


**संपादक**
सुहास खंडागळे
**व्यवस्थापक**
सौ. अरुणा किरण जाधव
मो. ९९८७५१२००१
**छायाचित्रकार/प्रतिनिधी**
सुदेश सकपाळ
**वितरण प्रतिनिधी**
संतोष मदने
**ऑफिस पत्ता :-**
गाळा नं. ०६, आई जीवदानी कॉम्प्लेक्स, हरिशश्चंद्र अपार्टमेंटच्या मागे,वारेकर शाळेजवळ, गुरुदर्शन नगर, मुंब्रादेवी कॉलनी रोड, दिवा (पूर्व), ठाणे-४००६१२.


## खुन करणाऱ्यास मुंबईतून अटक ठाणे शहर पोलिसांची कामगिरी

**ठाणे:** खुन व मोक्का या प्रकरणात पाहिजे असलेला रॉबिन राजेश सिन्हा याला ठाणे शहर पोलिसांनी मुंबई ,बोरिवली या परिसरातून जेरबंद केले. तो मागील अडीच वर्षापासुन पोलीसांची नजर चुकवुन स्वतःचे अस्तित्व लपवुन भारत देशभर वेगवेगळ्या शहरात राहत असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

ठाणे पोलीस आयुक्तालय परिसरातील महात्मा फुले चौक पोलीस ठाण्यात त्यांच्याविरोधात भादवि कलम ३०२, ५०६ (२), ३४, १२०(ब) सह भाहका कलम ३, २५, २७ सह म.पो.का कलम ३७ (१) १३५, सह एम.सी.ओ.सी कायदा कलम ३ (१) (प), ३(२), ३(४) प्रमाणे गन्हे दाखल आहेत. त्या गुन्ह्यातील पाहिजे असलेला रॉबीन राजेश सिन्हा हा सदरचा गंभीर स्वरूपाचा गुन्हा करून मागील अडीच वर्षापासुन पोलीसांची नजर चुकवुन स्वतःचे अस्तित्व लपवुन भारत देशभर वेगवेगळ्या शहरात राहत होता. आरोपीताचे निश्चीत ठावठिकाणाची काहीएक उपयुक्त माहिती मिळत नव्हती. त्याचा शोध घेण्याबाबत वरीष्ठांकडुन मिळालेल्या सुचनेनुसार मालमत्ता गुन्हे शाखेने त्याला अत्यंत चिकाटिने,

कसोशिने तपास करून त्याचे ठावठिकाणाची माहिती प्राप्त करून मुंबई बोरीवली या भागात त्याचा शोध घेवुन सापळा कारवाई करून ताब्यात घेत अटक केली.त्याच्या विरोधात मुंबईतील काळाचौकी पोलीस ठाणे मुंबई येथे भादवि कलम ४२०, ४०६, ४६५, ४६७, ४६८, ४७१, ४७४, १२०(ब), ३४ प्रमाणे गुन्हा दाखल आहे. याप्रकरणी पुढील तपास मालमत्ता गुन्हे कक्षाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक आनंद रावराणे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.


हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक आणि संपादक सुहास शांताराम खंडागळे यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया आणि पब्लीकेशन प्रा. लि. प्लॉट क्र. डब्ल्यू २३०, टीटीसी खैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून, श्रीकृपा बिल्डींग, ए-विंग, पहिला माळा, फ्लॅट क्रमांक १०१, सेंट मेरी शाळेजवळ, दिवा (पूर्व), ठाणे-६१२ ता/जि-ठाणे राज्य-महाराष्ट्र येथून प्रकाशित केले. संपर्क-८०८०९७७९५५

**संपादक-सुहास शांताराम खंडागळे RNI No.-MAHMAR/2021/80669**

Printed, Published and Owned by Suhas Shantaram Khandagale and Printed at Siddhhakala Print Media & Publication Pvt. Ltd. Plot No. W--230, TTC Industrial Area, Khairane, Navi Mumbai-400710. Dist. Thane, Maharashtra and Published at Shri Krupa Building, A-Wing, First Flr., Flat No. 101, Near Sent Marry School, Diva (E), Thane-400612 Taluka/Dist. Thane, State-Maharashtra. **Editor : Suhas Shantaram Khandagale, RNI No.-MAHMAR/2021/80669**

# जिल्ह्यात १६ नव्या कोरोना रुग्णांची नोंद

## सक्रिय रुग्णांची संख्या ५८ झाली

### ठाणे शहरात सर्वाधिक २७ सक्रिय रुग्ण

**ठाणे:** ठाणे जिल्ह्यात गेल्या काही दिवसांपासून कोरोना रुग्ण आढळून येण्याचे प्रमाण हळूहळू वाढताना दिसू लागले आहे. त्यातच शनिवारी (११ मार्च) एकदम कोरोनाच्या १६ नव्या रुग्णांची नोंद झाली आहे. विशेषतः ठाणे महापालिका कार्यक्षेत्रात त्यापैकी ११ रुग्ण असल्याचे दिसत आहे. या वाढत्या रुग्ण संख्येमुळे सक्रिय रुग्णांचा आकडा हा ५८ वर पोहोचला आहे.

ठामपामध्ये नोंदवलेल्या ११ रुग्णांमुळे सक्रिय रुग्णांची संख्या २७ इतकी झाली आहे. तर नवीमुंबई आणि ठाणे ग्रामीण मध्ये प्रत्येकी २ रुग्ण सापडले आहेत. सक्रिय रुग्णांची नवीमुंबईमधील संख्या १० तर ठाणे ग्रामीणची ८ झाली आहे.मीरा भाईंदर मध्ये एक रुग्ण नोंदवला गेला असून तोच एक सक्रिय रुग्ण आहे. कल्याण डोंबिवलीत शनिवारी रुग्ण आढळून आला नसला तरी तेथील सक्रिय रुग्णांची संख्या ही ४ आहे. उल्हासनगर, भिवंडी, कुळगाव बदलापूर या ठिकाणी शनिवारी एक ही रुग्णाची नोंद झालेली नाही. पण, उल्हासनगर -२, भिवंडी -६ सक्रिय रुग्ण आहेत.कुळगाव बदलापूरला सक्रिय रुग्ण नसल्याची माहिती ठाणे जिल्हा शासकीय रुग्णालय प्रशासनाने दिली.

पहिली आणि दुसरी लाटेही मार्च आणि एप्रिल मध्येच आली होती. त्यादरम्यान कोरोना रुग्ण संख्या वाढू लागली होती. त्यातच बूस्टर डोस घेण्याकडे नागरिकांनी आता पाठ फिरवली आहे. तसेच सध्याचे वातावरण रुग्ण वाढीस पूरक असल्याचे दिसत आहे. परंतु नेमके कारण अद्यापही समोर आले नाही. मात्र शासकीय नियमावलीनुसार तोंडाला मास्क लावणे अनिवार्य आहे. त्याचबरोबर गर्दीत जाणे टाळावे. हात स्वच्छ धुवावे या त्रिसूत्री धोरण नागरिकांनी अंगिकरण करावे. असे आवाहन तज्ज्ञांनी केले आहे.

## सक्षम पाणी पुरवठा नसताना गगनचुंबी इमारतींना मंजुऱ्या

### आमदार संजय केळकर यांची लक्षवेधी..

**ठाणे:** पुरेसे पाणी देणारी व्यवस्था नसताना ठाणे महापालिकेने बहुमजली इमारतींच्या बांधकामांना मंजुऱ्या दिल्या. आधीच पाण्याचा तुटवडा असताना या नवीन हजारो रहिवाशांना पाणी कसे पुरवणार असा प्रश्न उपस्थित करत आमदार संजय केळकर यांनी ठाणेकर रहिवाशांची कोट्यवधींची लूट करणाऱ्या टँकर लॉबीविरोधात कारवाईची मागणी केली.

अर्थसंकल्पीय अधिवेशनात आमदार संजय केळकर यांनी लक्षवेधी मांडत ठाण्यातील पाणीटंचाईबाबत प्रश्न उपस्थित केले. पाण्याची टंचाई असताना महापालिका नवीन बांधकामांना परवानग्या देत असल्याने उच्च न्यायालयात याबाबत याचिका दाखल करण्यात आली आहे. यावर न्यायालयाने पुरेसे पाणी पुरवता येत नसेल तर नवीन बांधकामांना परवानगी देण्यात येऊ नये, असे आदेश दिले होते. तर ठाणे महापालिकेने पुरेसा पाणी पुरवठा करू, असे प्रतिज्ञापत्र सादर केले. मात्र तरीही ठाणे शहरातील अनेक भागात पाणी टंचाई असूनही पालिका बहुमजली इमारतींना परवानगी देत असल्याचे श्री.केळकर यांनी सभागृहाच्या निदर्शनास आणले. ही नवीन बांधकामे बंद करणार का, असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. ठाणे शहरात ५० मजल्यांच्या १५ आणि एक ७२ मजली इमारतीला परवानगी दिली आहे. आधीच पाणी टंचाई असताना या इमारतींमधील हजारो नागरीकांना पाणी कसे पुरवणार असा प्रश्न आ.केळकर यांनी उपस्थित केला. कोपरी-पाचपाखाडी मतदारसंघात जादा पाणी पुरवठा करण्याचा निर्णय झाला आहे.

## मागासवर्गीय गृहनिर्माण योजनेंतर्गत पुनर्विकास धोरण लवकरच-मंत्री संजय राठोड

**ठाणे:** सर्वसामान्य मागासवर्गीयांसाठी सामाजिक न्याय विभागामार्फत मागासवर्गीय गृहनिर्माण योजना राबविली जाते. लवकरच मंत्रीमंडळासमोर मागासवर्गीय गृहनिर्माण योजनेंतर्गत पुनर्विकास धोरण आणण्यात येईल, असे मंत्री संजय राठोड यांनीसांगितले.

सदस्य वर्षा गायकवाड यांनी मुंबईतील विक्रोळी, कन्नमवार नगर येथील ४५ वर्षांपूर्वी मागासवर्गीयांसाठी बांधण्यात आलेल्या गृहनिर्माण योजनेच्या पुनर्विकास कामाबाबतचा प्रश्न उपस्थित केला होता.

मंत्री राठोड म्हणाले की, राज्यातील मागासवर्गीयांच्या निवाऱ्याचा प्रश्न सोडविण्यासाठी राज्य शासनाने युध्दोत्तर पुनर्वसन योजना-२१९ सुरु केली. या योजनेंतर्गत मागासवर्गीय सहकारी गृहनिर्माण संस्थांना भूखंडाचे वाटप करण्यात आले आहे. या योजनेंतर्गत मागासवर्गीय सहकारी गृहनिर्माण संस्थांना अनेक सवलती जसे की, अनुदान, कर्ज, जमीन अनुदान तसेच सरकारी जमीन उपलब्ध असल्यास निशुल्क दिली जाते. या संस्थांबाबत मागासवर्गीय सभासदांचे प्रमाण ९० टक्के आणि अमागासवर्गीय सभासदांचे प्रमाण १० टक्के इतके निश्चित करण्यात आले आहे.

मुंबईत सर्वसामान्य मागासवर्गीयांसाठी गृहनिर्माण योजनेंतर्गत इमारती बांधण्यात आल्या आहेत. या इमारतींना ४० ते ५० वर्षे होऊन गेली आहेत. या इमारतींच्या पुनर्विकासाबाबतचे धोरण ठरविण्यात येत आहे. पुनर्विकासाबाबत समाजकल्याण आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली समिती तयार करण्यात आली असून या समितीने केलेल्या शिफारशी शासनास सादर करण्यात आल्या आहेत. लवकरच याबबतचे धोरण निश्चित करण्यात येईल, असे राठोड यांनी सांगितले.

## कळव्यातील महिलांना महिला दिनाची अनोखी भेट मुकुंद केणी क्रीडा संकुलात सुरु झाला 'वुमेन्स झोन'



**ठाणे :** जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जात असतानाच कळवा येथे आ. डॉ. जितेंद्र आव्हाड यांच्या मार्गदर्शनाखाली मंदार केणी रूपलहर संकल्पनेतून मुकुंद केणी क्रीडा संकुलात सुरु झाला 'वुमेन्स झोन' सुरु करण्यात आला आहे. 'हेल्दी वूमेन्स... हेल्दी फॅमिली' या संकल्पनेतून क्रीडा संकुलामध्ये फक्त महिलांसाठी स्वतंत्र विभाग करण्याची हा महाराष्ट्रातील पहिलाच प्रयत्न आहे.

काही महिन्यांपूर्वीच कळवा येथील छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयानजीक स्व. मुकुंद केणी क्रीडा संकुलाचे लोकार्पण करण्यात आले आहे. विविध क्रीडा प्रकारांनी सज्ज असलेल्या या क्रीडा संकुलात महिलांसाठी स्वतंत्र विभाग असावा, अशी संकल्पना मंदार किणे यांनी मांडली होती. त्यांच्या या संकल्पनेतून 'सुदृढ महिला..सदृढ कुटुंब' हा विचार समोर ठेवून झुम्बा, ॲक्युप्रेशर वॉक, योगा आणि खुली व्यायामशाळा या प्रकारांनी सज्ज असलेला स्वतंत्र विभाग



सुरु करण्यात आला आहे. महिला दिनाचे औचित्य साधून राष्ट्रवादी काँग्रेसच्या ठाणे-पालघर महिलाध्यक्षा ऋता आव्हाड आणि मा. विरोधी पक्षनेत्या प्रमिलाताई केणी यांच्या हस्ते या स्वतंत्र दालनाचे उद्घाटन करण्यात आले.

यावेळी राष्ट्रवादी महिला काँग्रेसच्या शहर कार्याध्यक्षा सुरेखाताई पाटील, माजी नगरसेविका अपर्णा साळवी,मनिषा साळवी, मनाली पाटील, मंदार केणी आदी उपस्थित होते.

दरम्यान, स्व. मुकुंद केणी क्रीडा संकुलातील हा वुमेन्स झोन सकाळी ७ वाजता खुला होणार असून दिवसभरासाठी सुरु राहणार आहे. अशा पद्धतीने एखाद्या क्रीडा-उद्यानामध्ये महिलांसाठी स्वतंत्र विभाग सुरु करण्याची राज्यातील ही पहिलीच वेळ असल्याने सबंध मंदार केणी यांचे कौतूक होत आहे.

# जागतिक ‘महिला दिना’निमित्त दिव्यात शिवसेनेमार्फत भव्य ‘महिला सन्मान रॅली’





**दिवा:**–शिवसेना दिवा शहराच्या वतीने महिला सन्मान रॅली काढून जागतिक महिला दिन साजरा करण्यात आला. दिवा चौकात पासून ते सिद्धिविनायक गेट, बी.आर. नगर, धर्मवीर नगर, दातवली तिसाई नगर शिवसेना शाखा येथील विठ्ठल रुक्माई मंदिर मध्ये जाऊन महिलां तर्फे पूजा करण्यात आली.दिवा विभागातील शेकडो महिला या कार्यक्रमात सहभागी झाल्या होत्या. यावेळी मा. नगरसेविका दिपाली उमेश भगत, अर्चना पाटील, सुनिता गणेश मुंडे, दर्शना चरणदास म्हात्रे, साक्षी रमाकांत मढवी,व माजी उपमहापौर रमाकांत मढवी, मा. नगरसेवक शैलेश पाटील ,अमर पाटील, दीपक जाधव, गणेश मुंडे, आदेश भगत, निलेश पाटील, उमेश भगत यांसह उपविभाग प्रमुख, शाखाप्रमुख महिला पदाधिकारी आणि कार्यकर्ते शिवसैनिक व सर्व महिला उपस्थित होते.





## नवी मुंबई महानगरपालिकेतील कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या मानधनवाढीबाबत शासन सकारात्मक –उद्योगमंत्री उदय सामंत

: नवी मुंबई महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील विविध विभागांमध्ये अधिकारी व कर्मचारी करार व कंत्राटी पद्धतीवर आहेत. या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या मानधनात वाढ करण्याबाबत शासन सकारात्मक असून अधिवेशन काळात याबाबत बैठक घेण्यात येईल, असे मंत्री उदय सामंत यांनी विधानसभेत सांगितले.

विधानसभा सदस्य मंदा म्हात्रे यांनी नवी मुंबई महानगरपालिकेतील करार व कंत्राटी पद्धतीवरील अधिकारी व कर्मचाऱ्यांना विशेष बाब म्हणून कायम करण्याबाबत लक्षवेधी सूचना मांडली होती.

मंत्री सामंत म्हणाले, नवी मुंबई महानगरपालिकेतील करार व कंत्राटी पद्धतीवरील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या मानधनात पाच वर्षांपूर्वी वाढ करण्यात आली आहे. या कर्मचाऱ्यांना सेवेत कायम करणे शक्य नसल्याने सध्या कार्यरत कंत्राटी अधिकारी आणि कर्मचारी यांच्या मानधन वाढीबाबत नवी मुंबई महानगरपालिका आयुक्त यांना आढावा घेण्याच्या सूचना देण्यात येतील.



**शिवसेना (उध्दव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या वतीने सौ. योगीता हेमंत नाईक (महिला उपशहर संघटक) यांच्या दातिवली येथिल जनसंपर्क कार्यालयात महिलादिन उत्साहात साजरा करण्यात आला.यावेळी महिला पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.**

# शहर फेरीवाला समितीच्या निवडणुकीची कामगार खात्याकडे शिफारस करणार –आयुक्त बांगर

**ठाणे:** ठाणे शहरातील नोंदणीकृत फेरीवाल्यांची अंतिम यादी आता प्रसिध्द झाली आहे. त्यामुळे ही प्रक्रिया पुढे जाण्याच्या दृष्टीने शहर फेरीवाला समितीची निवडणूक घेण्याची शिफारस कामगार आयुक्तांकडे करण्यात येणार आहे. तसेच, फेरीवाला यादी अद्ययावत करण्याचे काम सातत्याने सुरू राहील, अशी माहिती आयुक्त अभिजीत बांगर यांनी शहर फेरीवाला समितीच्या बैठकीत दिली.

फेरीवाला क्षेत्र कोणते, कुठे कारवाई होणार नाही, नोंदणीपत्र कधी मिळणार याबद्दल फेरीवाल्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर संभ्रम आहे. तो दूर करण्यासाठी फेरीवाला धोरणाप्रमाणे चौथ्या टप्प्यातील कार्यवाही करण्याची आता गरज आहे. त्यानुसार, शहरातील १ हजार ३६६ नोंदणीकृत फेरीवाल्यांच्या मतदानातून नवीन शहर फेरीवाला समिती लवकरात लवकर निवड करणे आवश्यक असल्याचे मत आयुक्त बांगर यांनी मांडले. तशी शिफारस आता कामगार आयुक्तांकडे करण्यात येईल. कामगार आयुक्त निवडणुकीची प्रक्रिया पूर्ण करतील, असेही आयुक्तांनी स्पष्ट केले.

शहर फेरीवाला समितीची सभा बुधवारी महापालिका आयुक्तांच्या कार्यालयात झाली. या सभेस, उपायुक्त मारुती खोडके, जी.जी. गोदेपुरे, तसेच समितीच्या ३० सदस्यांपैकी १७ सदस्य उपस्थित होते.या बैठकीत, समिती सदस्यांनी फेरीवाला नोंदणीपत्र मिळण्यातील अडचणी मांडल्या. दोन वर्षांत सर्वेक्षण झालेले नसल्याने फेरीवाल्यांची फेर सर्वेक्षणाची मागणी असल्याचेही सदस्यांनी बैठकीत सांगितले. अंतिम यादीतील काही नावांविषयी आक्षेप काही सदस्यांनी नोंदवला. फेरीवाल्यांच्या तुलनेत नोंदणीकृत फेरीवाल्यांची संख्या खूप कमी असल्याचे मत सदस्यांनी बैठकीत मांडले. या सर्व सूचनांचा आढावा घेतला जाईल. त्यातील नियमाप्रमाणे असलेल्या गोष्टींची पूर्तता केली जाईल, असे आयुक्त बांगर यांनी स्पष्ट केले.

# ठाकरेंच्या शिवसेनेकडून दिव्यातील रस्त्यांवर गतिरोधक बसवण्याची मागणी



**दिवा:**–शिवसेनेच्या(उद्धव बाळासाहेब ठाकरे) वतीने दिवा शहरातील प्रमुख रस्त्यांवर महत्वाच्या ठिकाणी गतिरोधक बसवण्याची मागणी करण्यात आली आहे.

शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे दिवा शहराच्या वतीने मा.आमदार,संपर्कप्रमुख कल्याण लोकसभा सुभाष भोईर यांच्या मार्गदर्शनाखाली व उपशहरप्रमुख सचिन राम पाटील यांच्या नेतृत्वात दिवा शहरातील प्रमुख पदाधिकारी यांनी दिवा प्रभाग समिती अधिकाऱ्यांची याबाबत भेट घेतली. शहरातील रहदारीचे रस्ते ,अशा प्रमुख रस्त्यांवर जिथे शाळा, धार्मिक स्थळे, रुग्णालय आहेत अशा वर्दळीच्या ठिकाणी अपघात टाळण्यासाठी गतिरोधक बसविण्याच्या मागणीचे पत्र दिवा प्रभाग समितीचे सहाय्यक आयुक्त श्री. प्रितम पाटील यांना देण्यात आले. याप्रसंगी सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपअभियंता श्री. वसावे हे ही उपस्थित होते. सोबत महिला उपशहर संघटक सौ. प्रियांका सावंत, विभागप्रमुख मच्छिंद्रनाथ लाड, महिला विभाग संघटक सौ. स्मिता जाधव, युवासेनेचे अभिषेक ठाकूर, वैष्णव पाटील उपस्थित होते.

# वांझोळे हायस्कूलचे माजी मुख्याध्यापक एस. एन. सातपुते यांचा माजी विद्यार्थ्यांकडून सेवा निवृत्ती सोहळा संपन्न

## समाज प्रबोधन विचार मंच व आजी–माजी विद्यार्थी यांच्याकडून कार्यक्रमाचे आयोजन!



*__मुंबई:__–शिवाजी माध्यमिक विद्यालय वांझोळे येथे ३४ वर्षे प्रदीर्घ शैक्षणिक सेवा करणारे मुख्याध्यापक एस एन.सातपुते सर यांचा नुकताच मुंबई येथे सेवा पूर्ती सोहळा संपन्न झाला.आजी माजी विद्यार्थ्यांनी मिळून हा कार्यक्रम आयोजित केला होता.*

*यावेळी आजी- माजी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.*

*या कार्यक्रमासाठी समाज प्रबोधन विचार मंच,वांझोळेच्या कार्यकारणीने विशेष मेहनत घेतली.*

*एस.एन. सातपुते सर यांनी कठीण काळात वांझोळे हायस्कूल मध्ये शैक्षणिक सेवा देताना अनेक विद्यार्थी घडवले.विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण आणि शिस्त लागावी यासाठी सातपुते सर कायम आग्रही राहिले.*

*तब्बल ३४ वर्षे श्री सातपुते सर यांनी मुख्याध्यापक म्हणून धुरा सांभाळली.सरांप्रती असणाऱ्या भावनेतून विद्यार्थ्यांनी त्यांना अनोख्या पध्दतीने मुंबई सेवा समाप्ती बाबत निरोप दिला. यावेळी माजी विद्यार्थिनींसाठी हळदीकुंकू समारंभ आयोजित करण्यात आला होता. तर आजी–माजी विद्यार्थ्यांनी सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले.*

*यावेळी मंचावर मान्यवर म्हणून समाज प्रबोधन विचार मंच वांझोळे गावचे अध्यक्ष श्री.उदय सनगले, सचिव श्री. दिनेश गवळी, खजिनदार श्री विजय शिवगण,मार्गदर्शक श्री राहुल कांबळे, गाव विकास समिती रत्नागिरी जिल्हा संघटनेचे उपाध्यक्ष मंगेश धावडे, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी वडाळा तालुका उपाध्यक्ष आणि समाज प्रबोधनचे कार्याध्यक्ष श्री.लक्ष्मण नाईक, उप कार्याध्यक्ष श्री लक्ष्मण सनगले, समाज प्रबोधनचे सदस्य व जुगाई केदारलिंग मंडळाचे अध्यक्ष प्रकाश वाजे, श्री अनंत कोटकर, वांझोळे भोईवाडा शाळेचे माजी मुख्याध्यापक व संस्थेचे माजी सचिव श्री. राजाराम सनगले सर, ग्रा.पं.सदस्य श्री प्रकाशशेठ चव्हाण सामाजिक कार्यकर्ते श्री.महादेव कदम, गावातील प्रतिष्ठित उद्योजक श्री. संदीप शिवगण, शिवसेना संपर्क प्रमुख (ओझरे गट) श्री. गंगाराम सनगले, श्री अनंत सनगले..संघटनेचे सर्व सदस्य, मुंबईतील उद्योजक माजी विद्यार्थीमनोहर महाडीक,माजी विद्यार्थी श्री.दिपक जाधव, श्रीमती. जयश्रीताई पंदेरे, खास चैन्नई वरुन आलेले माजी विद्यार्थी श्री.दशरथ पंदेरे आदी मान्यवर उपस्थित होते.*

# सिंधुदुर्ग वैद्यकीय महाविद्यालयाच्या बांधकामासाठी प्रकल्प व्यवस्थापक सल्लागार नेमावा – वैद्यकीय शिक्षण मंत्री गिरीश महाजन

*सिंधुदुर्ग:सिंधुदुर्ग येथील वैद्यकीय महाविद्यालयाचे बांधकाम लवकर पूर्ण होण्यासाठी प्रकल्प व्यवस्थापक सल्लागाराची नेमणूक सार्वजनिक बांधकाम विभागाने तातडीने करण्याच्या सूचना वैद्यकीय शिक्षण मंत्री गिरीश महाजन यांनी दिल्या.*

*वैद्यकीय शिक्षण मंत्रीमहाजन यांच्या अध्यक्षतेखाली आज विधानभवनात सिंधुदुर्ग येथे उभारण्यात येणाऱ्या वैद्यकीय महाविद्यालयाच्या सद्यस्थितीबाबत आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीस वैद्यकीय शिक्षण आयुक्त राजीव निवतकर, वैद्यकीय शिक्षण विभागाचे उप सचिव प्रकाश सुरवसे, वैद्यकीय शिक्षण संचालक डॉ. दिलीप म्हैसेकर, सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपसचिव तेलंग, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधीक्षक अभियंता श्रीमती नाईक, सिंधुदुर्ग शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता श्री. गुरव, कार्यकारी अभियंता श्री. सर्वगोडे उपस्थित होते.*

*मंत्री महाजन म्हणाले की, सन २०२१-२२ पासून जिल्हा रुणालयातील विविध इमारतींमध्ये वैद्यकीय महाविद्यालय आणि वसतीगृह कार्यरत आहे. वैद्यकीय शिक्षण विभागाच्या २९ जून २०२२ च्या शासन निर्णयानुसार सिंधुदुर्ग येथे १०० विद्यार्थी क्षमता आणि ५०० खाटांचे रुणालय बांधण्यात येणार आहे. इमारतीच्या बांधकामासाठी ४२७.५७ कोटी रुपयांची प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. याशिवाय सन २०२२-२३ च्या हिवाळी अधिवेशनात पुरवणी मागणीद्वारे ४३ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. या अंतर्गत प्रथम १५ हजार चौ.मी. जमिनीवर अनुज्ञेय टप्पा १ चे बांधकाम करण्यात येणार आहे. तसेच टप्पा २ बाबत आवश्यक ती कार्यवाही करून बांधकाम सुरू करण्यात यावे, अशा सूचना मंत्री श्री.महाजन यांनी यावेळी केल्या.*

# कोडींगला प्रोत्साहन देऊन विद्यार्थ्यांना भविष्यासाठी तयार करण्याकरिता शिक्षण विभागाचा अमेझॉन सोबत करार

**मुंबई** – कोडींगला प्रोत्साहन देऊन विद्यार्थ्यांना भविष्यासाठी तयार करण्याचा शासनाचा मानस आहे. या उद्देशाने राज्याचा शालेय शिक्षण विभाग आणि मेझॉन फ्युचर इंजिनिअर इनिशिएटिव तसेच लीडरशिप फोर इक्विटी या दोन संस्थांसमवेत शालेय शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांच्या उपस्थितीत शुक्रवारी सामंजस्य करार करण्यात आला. शालेय शिक्षण विभागाचे प्रधान सचिव रणजित सिंह देओल, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेचे राज्य प्रकल्प संचालक कैलास पगारे आदी यावेळी उपस्थित होते.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० ला अनुसरून समस्या सोडविण्याची क्षमता विकसित करण्याच्या दृष्टीकोनातून हा उपक्रम तयार करण्यात आला आहे. या अंतर्गत शिक्षकांचे प्रशिक्षण आणि पायाभूत सुविधा तयार करणे आणि एकात्मिक अभ्यासक्रम तयार करण्यावर लक्ष केंद्रित केले जाणार आहे.

पुणे, अहमदनगर, सातारा, सोलापूर, कोल्हापूर, सिंधुदुर्ग, नाशिक, नागपूर, आणि औरंगाबाद या नऊ जिल्ह्यात हा उपक्रम सुरू करण्यात येत असून एक लाख विद्यार्थ्यांना याचा लाभ मिळणार आहे. भविष्यात रोजगार मिळविण्यासाठीच्या स्पर्धात्मक युगात विद्यार्थ्यांसाठी हा उपक्रम उपयुक्त ठरेल, असा विश्वास शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांनी व्यक्त केला.

# लांजा ग्रामीण रुग्णालयातील रिक्त पदे भरण्याची कार्यवाही सुरू

## – सार्वजनिक आरोग्य मंत्री डॉ. तानाजी सावंत

**रत्नागिरी :** ग्रामीण रुणालय लांजा येथे २८ मंजूर पदांपैकी २१ पदे भरण्यात आलेली असून रिक्त पदे भरण्याची कार्यवाही सुरू असल्याचे सार्वजनिक आरोग्य मंत्री डॉ.तानाजी सावंत यांनी विधानसभेत सांगितले.

विधानसभा सदस्य राजन साळवी यांनी रत्नागिरी जिल्ह्यातील लांजा येथील ग्रामीण रुणालयातील रिक्त पदांबाबत प्रश्न उपस्थित केला होता.

मंत्री डॉ. सावंत म्हणाले की, ग्रामीण रुणालय लांजा येथील अधीक्षक पद रिक्त आहे. याबाबत विभागामार्फत चौकशी करून अहवाल मागविण्यात येईल. राज्यातील आरोग्य विभागातील रिक्त पदे भरण्याची प्रक्रिया सुरू आहे.

यावेळी झालेल्या चर्चेत सदस्य सर्वश्री अशोक चव्हाण, अनिल देशमुख, शेखर निकम, राम सातपुते, आदिती तटकरे, देवयानी फरांदे यांनी सहभाग घेतला.

# पोलीस पाटील यांच्या मानधनवाढीबाबत शासन सकारात्मक –उपमुख्यमंत्री फडणवीस

**ठाणे:** ग्रामीण व्यवस्थेतील पोलीस पाटील हा अत्यंत महत्वाचा घटक आहे. राज्य शासन पोलीस पाटीलांची रिक्त पदे भरण्याबाबत आणि मानधन वाढविण्यासंदर्भात सकारात्मक आहे. यासाठी लवकरच शासकीय समितीची बैठक घेण्यात येणार असल्याची माहिती, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधान परिषदेत दिली.

राज्यातील पोलीस पाटील यांच्या प्रलंबित मागण्यांबाबत सदस्य गोपीचंद पडळकर यांनी प्रश्न उपस्थित केला होता. त्यास उत्तर देताना उपमुख्यमंत्री श्री.फडणवीस बोलत होते. यावेळी विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, शशिकांत शिंदे, सतेज पाटील यांनी उपप्रश्न उपस्थित केले. उपमुख्यमंत्री श्री.फडणवीस म्हणाले, अनेक वर्षे पोलीस पाटलांचे मानधन ३ हजार होते. ते सन २०१९ मध्ये वाढवून ६ हजार ५०० इतके करण्यात आले आहे. यामध्ये अधिक वाढ करण्यासंदर्भात सकारात्मक निर्णय घेण्यात येईल. तसेच ग्राम पोलीस पाटील अधिनियम सुधारणा करण्यासाठी गठित करण्यात आलेल्या समितीची बैठक घेण्यात येईल. तसेच पोलीस पाटलांच्या विविध समस्या सोडविण्यात येतील.

पोलीस पाटील यांच्या नियुक्तीच्या नुतनीकरणासाठी आवश्यक दाखले यांची पूर्तता करतानाच ही प्रक्रिया वेळेत व्हावी याकरिता संबंधित अधिकाऱ्यांना सूचना देण्यात आल्या आहेत.

# घोडबंदर रोडवरील ब्रम्हांड व वाघबीळ येथील दोन पादचारी पुलाला ठामपाची मंजूरी

**ठाणे : मेट्रोचे काम चालू असल्यामुळे घोडबंदर रोडवरील ब्रम्हांड आणि वाघबीळ या पादचारी पुलांची परवानगी नाकारली जात होती. यासाठी अनेक वेळा एमएमआरडीएच्या आयुक्तांची रहिवाश्यांसह वारंवार आमदार प्रताप सरनाईक यांनी भेट घेऊन घोडबंदर रोडवरील पादचारी पुल किती आवश्यक आहे हे पटवून दिल्यानंतर अखेर दोन्हीही पादचारी पुल बांधण्यासाठी एमएमआरडीएच्या अधिकाऱ्यांनी सर्व तांत्रीक बाजू तपासून व मेट्रोच्या कामामध्ये कुठेही अड्चण होणार नाही अश्या प्रकारे डिझाइन चेंज करून ठाणे महानगरपालिकेला मंजूरी दिली होती. त्यानुसार ठाणे महानगरपालिकेने निविदा प्रक्रिया राबविली होती. पुढील आवठड्यात या कामाचे भूमिपूजन होणार असल्याची माहिती आमदार सरनाईक यांनी दिली.**

घोडबंदर मार्गावर या परिसरात पादचारी पुल नसल्यामुळे अनेक नागरिकांना व वृध्दांना रस्ता क्रॉस करणे अवघड झाले आहे. तसेच घोडबंदर रोडवरून भरधाव धावणाऱ्या वाहनांमुळे अपघात होऊन काही नागरिकांचे प्राणही गेले होते. अखेर, आमदार प्रताप सरनाईक यांनी पाठपुरावा करून ब्रम्हांड व वाघबीळ येथील पादचारी पुलाचे काम मंजूर करून घेतले होते. मेट्रोच्या कामामध्ये कुठेही अड्चण होणार नाही त्यानुसार निविदा प्रक्रियेत समाविष्ट केल्याप्रमाणे ब्रम्हांड येथील पादचारी पुलाची लांबी ५२.२९ मी., रूंदी ३.७८ मी व उंची ५.६५ मी. ठेवण्यात येणार असून वाघबीळ येथील पादचारी पुलाची लांबी ४३.९४ मी., रूंदी ३.७८ मी व उंची ५.६५ मी. ठेवण्यात येणार आहे तसेच दोन्ही बाजूला चढण्या-उतरण्यासाठी रॅम्प बनविण्यात येणार असल्याचेही आमदार सरनाईक यांनी सांगितले.

त्याचप्रमाणे कासारवडवली, ओवळा, भायंदरपाडा व गायमुख या परिसरामध्ये सुध्दा फुट ओव्हर ब्रिज उभारण्याची मागणी नागरिकांमधून सातत्याने होत आहे. परंतू, सद्यपरिस्थितीमध्ये ठाणे महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती बेताची नसल्याने उर्वरीत चार पादचारी पुलांचा खर्च हा एमएमआरडीएने करावा, अशी मागणी आमदार त्यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे केली असता, ती मागणी मान्य केल्यामुळे पुढील उर्वरीत चारही फुट ओव्हर ब्रिज हे एमएमआरडीएच्या माध्यमातून लवकरच होणार असल्याने घोडबंदर रोडवरील पादचारी पुलाचा प्रश्न आता निकाली निघाला आहे. तसेच ब्रम्हांड व वाघबीळ येथे होणाऱ्या पादचारी पुलासाठी सुमारे १० कोटी रूपये खर्च होणार असून या दोन्ही पुलांचा कार्यादेश ठेकेदाराला देण्यात आला असून पुढील आठवड्यात त्यांचे भूमिपूजन होऊ असेही त्यांनी सांगितले.

# महिला दिनाचे औचित्य साधून दिव्यातील महिलांचा सन्मान सोहळा संपन्न!

जन विकास फॉउंडेशन, दिवा शहर संघटनेच्या वतीने ८ मार्च जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून दिवा शहरातील विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या कर्तृत्वान महिलेचा सन्मान करण्यात आला. तन्वी फाउंडेशन च्या अध्यक्षा सौ ज्योती राजकांत पाटील यांच्यासह समाजातील विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या महिलांचा यावेळी संस्थेच्या वतीने गौरव करण्यात आला. यावेळी संस्थेचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते .















# आरपीआय तर्फे जागतिक महिला दिन उत्साहात साजरा

**ठाणे –** दिवा विभाग रिपब्लिकन पक्षाच्या(आठवले) वतीने महिला आघाडीच्या दिवा विभाग अध्यक्षा सौ. शिलाताई त्रिभुवणे यांच्यामार्फत जागतिक महिला दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी भारतीय जनता पक्ष व म. न. से. पक्षाचे पदाधिकारी यांनी ही या कार्यक्रमाला उपस्थिती दर्शवली. दिवा विभागातील शेकडो महिला या कार्यक्रमात सहभागी झाल्या होत्या.

यावेळी रेश्माताई पवार, ज्योतीताई पाटील, मयुरीताई पोरजी, व निकिता ताई सालप, मानव अधिकार समितीच्या सुवर्णाताई कदम, सत्यज्योत महिला मंडळाच्या अध्यक्षा लिला गुप्ता,आणि काळुबाई महिला मंडळच्या अध्यक्षा रोकडे ताई, ख्यातनाम गायिका छायाताई मोरे, यांनीही उपस्थिती दर्शवली त्याच बरोबर बालाजी कदम, अभिषेक जाधव, विजय पवार, रींगणेकर, राहुल जोगदंड, राहुल शिंदे, आतिश सर्वाडे व कर्तिका सर्वाडे, आणि सहकरी उपस्थित होते.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी रिपब्लिकन पक्षाच्या सर्व दिवा विभाग कमिटी ने मेहनत घेतली व एकनाथ भगत, दिनेश पाटील, अनिकेत पाटील, यांचे मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम यशस्वी पार पडला.



# येऊर परिसर : बेकायदा बांधकामांचे आगार

## काँग्रेसचा आरोप

**ठाणे: संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाचा परिसर असलेल्या येऊरमध्ये तीनशेहून अधिक बेकायदा बंगले, हॉटेल आणि खेळाचे टर्फ असून येऊर परिसर हा पूर्णता बेकायदा बांधकामांचे आगार बनल्याचा आरोप ठाणे शहर काँग्रेसने केला आहे. त्याचबरोबर महापालिका आणि महसुल विभागाने बांधकाम परवानगी दिलेले बंगलेही नियमानुसार बेकायदेशीर असल्याचा दावा काँग्रेसने करत,त्या बंगल्यांवर कारवाई करण्याच्या मागणीसाठी उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल करणार असल्याचा इशाराही काँग्रेसचे शहराध्यक्ष विक्रांत चव्हाण यांनी शुक्रवारी ठाण्यात झालेल्या पत्रकार परिषदेत दिला.**

येऊर परिसर हा संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाचा भाग असून हे उद्यान तीन लाख एकर जागेत आहे. केंद्र शासनाने १९८३ मध्ये या उद्यानाची घोषणा केली. या ठिकाणी वायु दलाचे स्थानक आहे. अशा महत्वाच्या ठिकाणी स्थानिक आदिवासींना उदारनिर्वाहकरिता केवळ शेती करण्याची परवानगी आहे. हा परिसर उद्यानाच्या अख्यारित असला तरी तेथील जमिनींवर आदिवासींचे कुळ आहे. या जमिनी घेऊन त्यावर बेकायदा बांधकामे उभारली जात आहेत. त्यात बंगले, हॉटेल, लग्न सोहळ्याचे सभागृह आणि खेळाचे टर्फचा समावेश असून याठिकाणी पुर्वी असलेले वृक्षही नष्ट झाले आहेत, असा आरोप विक्रांत चव्हाण यांनी केला आहे. आदीवासींच्या नावाखाली बंगले, हॉटेल, लग्न सोहळ्याचे सभागृह आणि खेळाचे टर्फपर्यंत रस्ते बनविण्यात आलेले असून त्याठिकाणी पाणी सुविधाही देण्यात आली आहे. पण, स्थानिक आदिवासी मात्र पाणी सुविधेपासून वंचितच आहेत. हॉटेलमध्ये बेकायदा मद्य विक्री केली जात आहेत. त्यामुळे पालिकेसह इतर विभागांनी या सर्व बांधकामांना सर्व प्रथम टाळे लावून त्यानंतर ते भुईसपाट करावे अशी मागणी करत यासंदर्भात उच्च न्यायालयात लवकरच जनहित याचिका दाखल करणार असल्याचा इशारा त्यांनी दिला आहे.

आदीवासी बांधवांना पुढे करून काही गुंड टोळ्या तेथील जमीनींवर कब्जा करीत असल्याचा आरोप चव्हाण यांनी केला. या जमिनी ताब्यात आल्यानंतर त्यावर विविध विभागांची परवानगी घेऊन बांधकामे करण्यात येत आहे. हा प्रकार गेल्या काही वर्षांपासून सुरु झाल्याचा आरोपही याप्रसंगी चव्हाण यांनी केला आहे.

यावेळी काँग्रेसचे ठाणे शहराध्यक्ष अँड.विक्रांत चव्हाण, मुख्य प्रवक्ते सचिन शिंदे व प्रवक्ते राहुल पिंगळे आणि बाळासाहेब भुजबळ हे उपस्थित होते.

# मातीमाय– गोष्ट एका गावाची

## नाट्यप्रेमींनी पहायला हवं असं दर्जेदार नाटक!

नाटक खरे तर मनोरंजन करणारे असतात पण काही नाटक डोळ्यांत अंजन घालणारे नाटकही असतात त्यापैकी मातीमाय गोष्ट एका गावाची हे नाटक....या नाटकाचा शुभारंभाचा प्रयोग दि.२७ जानेवारी २०२३ रोजी डोंबिवली येथे संपन्न झाला. एक उत्कृष्ट नाट्यानुभव पाहण्यासाठी नाट्यप्रेक्षक गर्दी करत आहेत.

वास्तववादी कथा, अप्रतिम लेखन, साजेसं नेपथ्य, उत्तम संवाद, प्रकाशयोजना, प्रभावी दिग्दर्शन सर्वच अगदी भारावून टाकणारे.

तीच बाब मनाचा ठाव घेणाऱ्या संगीताची!

यावर कळस म्हणजे सर्वच कलाकारांचा जिवंत अभिनय.

पूर्वापार शोषित असलेल्या शेतकऱ्यांची व्यथा प्रत्येक कलाकाराच्या देहबोलीतून व्यक्त होते. कथानकात आपण कधी गुंतुन जातो कळतही नाही.

या नाटकात काम करणारे जवळजवळ सर्वच कलाकाराचा कसदार व जीव ओतून केलेला अभिनय कौतुकास्पदच! विशेष म्हणजे या नाटकात स्त्री कलाकारांनी साकारलेल्या भूमिका अतिशय उत्कृष्ट..

रामदा च्या संस्कारक्षम कुटुंबाची कहाणी डोळ्यात पाणी आणणारी होती, व नाटकात बहीण भावाचे प्रेम, पतीपत्नीचे संकट समयी एकमेकांना समजून उमजून घेण्याची पद्धत कळली, गावातील आनंदाचे वातावरण असताना , भावाभांवामधील दुरावा,तरुण वृद्धां मध्ये वैर , गावाची घडी कशी विस्कटली हे चित्र हुबेहुब पाहायला मिळते, गावातील शेतकऱ्यांच्या जमिनी गावातील पाटलांच्या स्वार्थी लोकांच्या सहकार्याने हडप केल्या तरी खचून न जाता गावातील शेतकरी आपल्या मातीमाय साठी कष्ट सहन करतात, मुलांना शिक्षित होण्यासाठी त्यांची धडपड पाहताना डोळे पाणावतात ,समाजाला प्रबोधन करणारे हे नाटक आहे, शेतकऱ्यांना आत्महत्या पासून परावृत्त करण्याचा संदेश देणारे, शिक्षण व संस्कार ला महत्त्व देणारे हे नाटक प्रेक्षकांना अगदी शेवटपर्यंत खुर्चीत खिळवून ठेवते.

या नाटकाचे लेखन डोळखांब (शहापूर)चे पंढरीनाथ पांढरे यांनी केले आहे, दिग्दर्शन श्री सुभाष नामदेव मुंडे यांनी केले आहे, निर्माता सचिन रतन पाटील , सहनिर्माते गणेश पाटील, संजय चवरे, नेपथ्य महेश पाटील, वासुदेव म्हात्रे, संगीत रुपेश गोंधळी, गीत/गायन डॉ गंगाराम ढमके संगीत ऑपरेटर रोहन सकट प्रकाश योजना समीर सावंत, कपडेपट शाम पाटील मेकअप विजय हर्णे यांनी केले असून या नाटकात पुढील कलाकारांनी भूमिका केल्या आहेत-कंचन पाटील, परीशा सरोदे, रेश्मा थळे, प्रणिता पाटील गणपत पाटील, वासुदेव म्हात्रे, महेश पाटील , गणेश पाटील, संदीप पाटील, सदानंद म्हात्रे , नरेश गायकर, विजय ऐनकर सचिन पाटील,कल्पेश डुकरे, श्रावण म्हात्रे , चिन्मय पाटीलआणि सुभाष मुंडे

कठीण परिस्थितीवर जिद्दीने मात करून व कष्ट करून आपण मार्ग काढु शकतो असा विश्वास देणारे हे नाटक..!

अशिक्षितपणामुळे आपलं आयुष्य हलाखीत गेलेल्या शेतकऱ्यांना, आपल्या पुढिल पिढिने शिकुन मोठे व्हावे यासाठी केलेला आटापिटा खुपच प्रेरणादायक!.

**स्वराज्य आर्ट प्रॉडक्शन च्या या अप्रतिम प्रयत्नाला उत्तुंग यश लाभो हीच सदिच्छा..!**

प्रेक्षकांच्या आग्रहास्तव पुन्हा एकदा...
स्वराज्य आर्ट प्रॉडक्शन निर्मित
स्वराज्य थिएटर्स
शिक्षण आणि संस्कार यांचे एकत्रित महत्व पटवून देणारे
शेतकऱ्यांच्या सत्य परिस्थितीवर आधारित दोन अंकी नाटक
सर्वोत्कृष्ट नाटक "५९" महाराष्ट्र राज्य हौशी मराठी नाट्य स्पर्धा कल्याण केंद्र २०१९-२०
मातीमाय
गोष्ट एका गावाची..
लेखक - पंढरीनाथ पांढरे दिग्दर्शक- सुभाष नामदेव मुंडे निर्मिति - सचिन रतन पाटील
निर्मिती सहाय्यक - गणेश कृष्णा पाटील, संजय हरिचंद्र चवरे
प्रमुख व्यवस्थापक - संदीप रघुनाथ पाटील नेपथ्य संकल्पना - नीलेश पिसाट, नेपथ्यकार - महेश पाटील, वासुदेव म्हात्रे, पार्श्वसंगीत- रुपेश गोंधळी, गीतकार/गायक - डॉ.गंगाराम ढमके, वेशभूषा - श्याम पाटील, रंगभूषा - विजय हरणे, प्रकाशयोजना - समीर सावंत, विशेष मार्गदर्शन आणि सहकार्य - एकनाथ देसले, टी.आर.पाटील, दीपक सरोदे प्रसिध्दि प्रमुख - गणेश पाटील, रोहन सकट GNS Film
कलाकार - कंचन पाटील, परीशा सरोदे, रेश्मा थळे, प्रणिता पाटील, गणपत पाटील, वासुदेव म्हात्रे, गणेश पाटील, संदीप रघुनाथ पाटील, सदानंद म्हात्रे, नरेश गायकर, महेश पाटील, विजय ऐनकर, सुजित रायकर, सुभाष मुंडे, सचिन पाटील, संजय चवरे, श्याम पाटील आणि चिन्मय पाटील
मंगळवार दि.१४ मार्च २०२३ सायं. ४ वा. ३० मि.
स्थळ - सावित्रीबाई फुले नाट्यगृह - डोंबिवली (पु)
टिकीट बुकींग नाट्यगृहावर आणि bookmyshow
फोन बुकींग - ८८३०३२१३११ / ८१०८८०१०१० / ८८७९६०८८२२